जा.क्र./अंदाज शाखा/6455 /२०२५
धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, सास्मिरा इमारत, सास्मिरा रोड,
वरळी, मुंबई-४०००३०.
दिनांक- 15 DEC 2025

**परिपत्रक क्रमांक ६२३ दिनांक १५/१२/२०२५**

आपल्या व आपल्या अधिनस्त कार्यालयांचे एकत्रित वार्षिक अंदाजपत्रक आपल्या कार्यालयांकडून परस्पर मा. विधि व न्याय विभाग, मंत्रालय येथे सादर करण्याची पध्दत आहे. पुरवणी मागणी व काही उद्दिष्टांतर्गत प्रलंबित देयकांसाठी अनुदानाची मागणी करतांना विभागिय कार्यालये व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांची एकत्रित माहिती मुख्यालयाकडून विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर करण्यात येत असते.

सदर अनुदानाची मागणी करणारे प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर होतात, त्यावेळी सदर विभागाकडून किंवा वित्त विभाग, मंत्रालय यांच्याकडून अनुदान प्रस्तावाबाबत पुरक माहिती मुख्यालयाकडून मागविली जाते. (उदा. प्रलंबित देयकांचा तपशिल, मागील तीन वर्षांचा खर्च, कमी अधिक बचत / खर्चाचा तपशील इ.)

सदर परिपत्रकाद्वारे सर्व अधिनस्त कार्यालयांना सूचना देण्यात येते की, वार्षिक अंदाजपत्रक विधी व न्याय विभागात पाठविल्यानंतर त्याची प्रत अंदाज शाखा, मुख्यालय यांना त्याचवेळी पाठवावी, जेणेकरुन अनुदानाकरीता मुख्यालयाकडून मंत्रालयात सादर केलेला प्रस्तावात व आपल्या कार्यालयाकडून परस्पर विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावात तफावत दिसून येणार नाही.

पुरवणी मागणीचा प्रस्ताव प्रथम मुख्यालयात सादर करावा, पुरवणी मागणीचा प्रस्ताव परस्पर विधी व न्याय विभागाला पाठवू नये.

अनुदान मागणीचे प्रस्ताव परिपूर्ण असावेत. मागील तीन वर्षाचा खर्च, कमी अधिक खर्च / बचतीची कारणे इ. प्रलंबित देयकांसाठी अनुदानाची मागणी असेल तर प्रलंबित देयकांचा तपशिल देणे आवश्यक आहे. शासनाने मंजूर केलेली परंतु अद्याप वितरित न झालेले अनुदान याबाबतचा प्रस्ताव सादर करताना वितरित झालेले संपूर्ण अनुदान प्रथम खर्च करण्याची कार्यवाही करावी.

शक्यतो मंजूर झालेले अनुदान त्या त्या चारमाहीमध्ये खर्च करण्याची कार्यवाही करावी, म्हणजे बचतीची कारणे देणे, पुढील कालावधीसाठी त्याप्रमाणात कमी अनुदान मंजूर होणे इ. प्रकार होणार नाहीत.

परंतु विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडून अतिरिक्त अनुदानाच्या मागणीचा प्रस्ताव सादर केला जातो, त्यावेळी मुख्यालयाकडून एकत्रित मागणी मागविली जाते. त्यावेळेस काही कार्यालयांची माहिती अप्राप्त असल्यास मुख्यालय यांनी दिलेल्या अनुदान प्रस्तावामध्ये आणि आपण परस्पर मागणी केलेल्या अनुदान प्रस्तावामध्ये तफावत दिसून येते.

सदर परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, आपल्या व आपल्या अधिनस्त कार्यालयांकरीता अनुदानाची मागणी विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे करत असतांना त्याची एक प्रत अंदाज शाखा, मुख्यालय यांस सादर करावी.

तसेच सर्व अधिनस्त कार्यालयांनी आपल्या नियंत्रक अधिकारी यांच्या मार्फतच अनुदानाची मागणी करावी आणि नियंत्रक अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त कार्यालयांची एकत्रित माहिती विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर करतांना सदर प्रस्तावाची एक प्रत मुख्यालयाला पाठवावी.

या परिपत्रकाद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना सूचना देण्यात येत आहेत की, शासनाला सादर केलेल्या अनुदान विषयक प्रत्येक प्रस्तावाची प्रत तात्काळ अंदाज शाखा मुख्यालय यांना देण्यात यावी.

सदर परिपत्रकाद्वारे काटेकोरपणे पालन करावे.

१५।१२।२५

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः-

१. परिपत्रक धारणी, आस्थापना शाखा, मुख्यालय.
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त.
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त.
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त.
५. अंदाज शाखा, मुख्यालय.
६. संगणक शाखा (संकेतस्थळावर प्रत उपलब्ध करुन द्यावी)